-39- -279-

Copy

शासकीय कर्मचाऱ्यांस अत्युत्कृष्ट कामाबाबत आगाऊ
वेतनवाढी मंजूर करण्याबाबत ---

(34)

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८१/१२११/सीएन-११०-आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ ऑगस्ट १९८१.

पहा :—१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७७/सीएन-१२७-७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर १९७९.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७८/सीएन-११-७९/आठ, दिनांक ५ डिसेंबर १९७९.

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७८/सीएन-११-७९/आठ, दिनांक २९ एप्रिल १९८०.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०८०/सीएन-११८/आठ, दिनांक २४ सप्टेंबर १९८०.

परिपत्रक :— शासकीय कर्मचाऱ्यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत सविस्तर सूचना प्रसारित केलेल्या असताही शासनाच्या निदर्शनास आले आहे की, शासकीय कार्यालयांत व विभागांत, शासकीय कर्मचाऱ्यांस अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी देण्याच्या योजनेची कार्यवाही दक्षतापूर्वक केली जात नाही. अंदाज समितीने आपल्या पाचव्या अहवालात या घटनेचा निर्देश केला असून ही योजना पुरेपूर कार्यवाहीत आणून कर्मचाऱ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचा शासनाने सातत्याने प्रयत्न करावा व या योजनेच्या अंमलबजावणीविषयी उदासीनता आढळल्यास, त्या मागील कारणे शोधून काढावी अशी शिफारस केली आहे. अंदाज समितीच्या या शिफारशीस अनुलक्षून शासन उपरोक्त विषयावरील आदेशांची पुनरुक्ती करीत आहे व संदर्भाधीन योजना पूर्णपणे व दक्षतापूर्वक कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

(अ) यापुढे प्रतिवर्षी, ज्या मंत्रालयीन विभागांकडून आगाऊ वेतनवाढीबाबतचे प्रस्ताव केले जाणार नाहीत, त्या विभागांनी असे प्रस्ताव न करण्यामागील कारणे, प्रस्ताव करण्यासाठी विहीत केलेल्या मुदतीत, सामान्य प्रशासन विभागाला कळवावी,

(ब) तसेच प्रतिवर्षी, सर्व मंत्रालयीन विभागांनी, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांनी किती चतुर्थवर्गीय व तृतीयवर्गीय कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्या किंवा कोणालाही अशा वेतनवाढी मंजूर न केल्यास, त्या मागील कारणे काय होती या विषयीची माहिती मिळवून ती पुढील वर्षाच्या १ जानेवारीपर्यंत सामान्य प्रशासन विभागास कळवावी. त्याप्रमाणे १९८१ ह्या वर्षात देण्यात आलेल्या वेतनवाढीबाबतची माहिती, १ जानेवारी १९८२ पूर्वी सामान्य प्रशासन विभागाकडे सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. अं. कोटेश्वर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत

राज्यपालांचे सचिव,

## विवरणपत्र

## वार्षिक अहवाल

वर्ष - १९

| मंत्रालयीन विभागाचे नाव | विभाग प्रमुखाचे नाव | अत्युत्कृष्ट कामानिमित्त आगाऊ वेतनवाढी देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | | वेतनवाढी न देण्यामागील कारणे |
|---|---|---|---|---|
| | | वर्ग - ३ | वर्ग - ४ | |
| १ | २ | ३ | | ४ |